Scan QR code to visit... Epaper Portal

www. sahyandrinews.com

# दैनिक सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २५७ • Title - Code :- MAHMAR49513 • शुक्रवार दि.२८ जून २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## थोडक्यात

### वाळू धोरणात बदल करण्याची सरकारची तयारी

**मुंबई**–सर्व सामान्यांना परवडेल अशा दरात वाळू उपलब्ध होण्यासाठी सरकारने वाळू धोरण घेतले आहे. या धोरणामध्ये अधिक सुलभता कशी येईल हाच सरकारचा प्रयत्न असून, या धोरणातील बदला बाबत काही सुचना आल्यास त्यांचा स्विकार सरकार करेल अशी ग्वाही महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.पावसाळी अधिवेशनाच्या दुस–या दिवशी उपस्थित करण्यात आलेल्या वाळू प्रश्नांवर बोलताना महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, गेली अनेक वर्षे या वाळू व्यवसायावर माफीयांचा प्रभाव होता. या व्यवसायातून गुन्हेंगारी करणही वाढले. सर्वसामान्य माणसाला होणारा त्रास कमी व्हावा म्हणूनच या सभागृहात चर्चा करुन, सर्वकष असे वाळू धोरण सरकारने आणून त्याची अंमलबजावणी सुरु केली. या धोरणाबाबत अजूनही सर्वांशी संवाद साधून, तज्ज्ञांची चर्चा करुन या धोरणात अधिक सुधारणा कशा करता येईल, यासाठी सरकारची तयारी असल्याचे त्यांनी त्यांनी सांगितले.

### अर्थसंकल्प नव्हे महायुतीचा निवडणूक जाहीरनामा

**मुंबई**–फसव्या योजनांची ठिगळं लावलेला खोकेसंकल्प आज अर्थमंत्र्यांनी विधानसभेत सादर केला आहे. अडिच वर्ष फक्त घोटाळे, टेंडर, कमिशन, टक्केवारी यातून मालामाल झालेल्या या महाभ्रष्टाचारी सरकारने आता निवडणुका डोळ्यासमोर ठेवून अतिरिक्त अर्थसंकल्पाच्या नावाखाली महायुतीचा निवडणूक जाहीरनामाच सादर केला आहे. महिलांसाठी योजना आणून या सरकारने प्रायश्चित्त घेतले आहे. अशा शब्दात विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी अतिरिक्त अर्थसंकल्पावर टिकास्त्र डागले आहे.आज विधानसभेत अर्थमंत्र्यांनी अतिरिक्त अर्थसंकल्प सादर केल्यानंतर वडेट्टीवार यांनी जळजळीत प्रतिक्रीया दिली आहे. वडेट्टीवार म्हणाले की, अर्थसंकल्पाच्या आडून महायुतीच्या आमदारांना खूश करण्यासाठी केलेला हा शेवटचा प्रयत्न म्हणजे हा अतिरिक्त संकल्प आहे. अडिच वर्षे तिजोरी साफ करून झाल्यावर सरकारी तिजोरीवर महायुती सरकारने शेवटचा हाथ मारून तिजोरी साफ केली आहे. स्वत:चे खोके भरून झाल्यावर जनतेसाठी काहीतरी केल्याचा केविलवाणा प्रयत्न या अर्थसंकल्पात केला आहे.महिलांसाठी योजना जाहीर करून महायुती सरकारने प्रायश्चित्त घेतले आहे. महायुतीमधील एका नेत्याने बहिण-भावाच्या नात्यावर केलेले घाणेरडे वक्तव्य महायुतीला चांगलेच महागात पडले आहे.

### अर्थसंकल्प म्हणजे थापांचा महापूर धुळफेक करून फसवण्याचा प्रयत्न

**मुंबई**–राज्याच्या अर्थसंकल्पावर बोलतांना उद्धव ठाकरे म्हणाले की, गेल्या लोकसभा निवडणुकांमध्ये भाजपच्या आश्वासनांना आणि थापांना चिरडून लोकांनी जो दणका दिला आहे. त्यामुळे यांच्यात थोडाफार फरक पडलेला दिसतोय. परंतु महाराष्ट्राची जनता ही समजदार आहे. ही जनता सरकारच्या थापांना बळी पडणार नाही. हा गाजराचा अर्थसंकल्प आहे, यामध्ये आर्थिक तरतूद कुठेही दिसत नसल्याचेही ठाकरे म्हणालेत. ठाकरे पुढे म्हणाले की, काहीतरी धुळफेक करायची जनतेला फसवायचं आणि पुन्हा सत्तेत येऊन जनतेला लुटण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचेही ठाकरे म्हणाले. आजचा अर्थसंकल्प म्हणजे आश्वासनांची अतिवृष्टी, थापांचा महापूर आहे. सर्वच घटकाला सोबत घेऊन जाण्याचं हे खोटं नरेटिव्ह असल्याचा उल्लेख उद्धव ठाकरे यांनी केला आहे.आजपर्यंत ज्या घोषणा महायुतीने केल्या त्याबाबत तज्ञांची कमेटी नेमून निवडणुकीपूर्वी श्वेतपत्रिका जाहीर करण्यात यावी. अनेक योजना अशा आहेत, ज्या घोषित झाल्या परंतु प्रत्यक्षात अंमलात आलेल्या नाही आहेत.

## तुका म्हणे बरा। लाभ काय तो विचारा

# निवडणुकीच्या तोंडावर घोषणांचा वर्षाव, शेतकरी,महिला,तरुणांसाठी आकर्षक योजना

**मुंबई (वृत्तसंस्था)–विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शेतकरी, महिला, विद्यार्थी अशा सर्वच घटकांवर विविध सवलती आणि अनुदानांच्या योजनांचा वर्षाव करणारा अतिरिक्त अर्थसंकल्प अर्थमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी सादर केला. मात्र, एक लाख दहा हजार कोटींची वित्तीय तूट, २० हजार कोटींची महसुली तूट असताना या सर्व योजनांसाठी आणखी एक लाख कोटींचा बोजा सरकारवर पडणार आहे. त्यासाठी निधी कुठून मिळणार, याचे उत्तर संकल्पात नाही. त्यामुळे या योजनांची अंमलबजावणी करताना राज्य सरकारला तारेवरची कसरत करावी लागणार असून त्यामुळेच की काय, विकासकामांसाठीच्या तरतुदीला अर्थसंकल्पात कात्री लावण्यात आली आहे. विधिमंडळाच्या अधिवेशनात अर्थमंत्री या नात्याने वैयक्तिक दहावा अर्थसंकल्प सादर करताना अजित पवार यांनी भाषणाची सुरुवात आणि शेवट जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या अभंगाच्या ओळींनी केली. आषाढी वारीनिमित्त तुकाराम महाराजांची पालखी देहूतून प्रस्थान ठेवत असतानाच, विधिमंडळातील भाषणात अजितदादांनी 'तुका म्हणे मज घडो त्यांची सेवा, तरी माझ्या दैवा, पार नाही' असे बोलून दाखवले. मात्र, सवलतींचा वर्षाव करणाऱ्या या 'सेवे'मागचे आर्थिक गणित न उलगडल्याने 'तुका म्हणे बरा। लाभ काय तो विचारा।।' असा तुकारामाचा प्रश्न या अर्थसंकल्पाबाबत उपस्थित होईल.**

लोकसभा निवडणुकीतील पराभवामुळे हादरलेल्या महायुतीच्या नेत्यांनी आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून विविध समाज घटकांवर सवलतींचा वर्षाव केला आहे. यातून सत्ताधारी पक्षांबद्दलची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना शेतीपंपासाठी मोफत वीज, २१ ते ६० वयोगटातील पात्र महिलांना दरमहा दीड हजार रुपये देणारी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना', इतर मागासवर्गीय किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थिनींना शैक्षणिक शुल्कमाफी, दारिद्र्य रेषेखालील पात्र कुटुंबाना दरवर्षी तीन सिलिंडर मोफत, विद्यार्थ्यांना १० हजार रुपये विद्यावेतन या नवीन योजना विधानसभा निवडणुकीतील प्रचारात महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. अपेक्षेप्रमाणे कोणतीही करवाढ अर्थमंत्र्यांनी केलेली नाही. त्याचवेळी मुंबई, ठाणे, नवी मुंबईत पेट्रोल, डिझेलवरील करात कपात करून या शहरांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे.



**विकास कामांवरील खर्चात कपात**

भांडवली म्हणजेच विकास कामांवर एकूण खर्चाच्या १३ टक्के रक्कम खर्च करण्यात येणार आहे. पण २०२३-२४ या आर्थिक वर्षात सुधारित अर्थसंकल्पात विकास कामांवर ९४ हजार ८५० कोटींची तरतूद करण्यात आली होती. पुढील वर्षाच्या अतिरिक्त अर्थसंकल्पात ९२,७७९ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

**राजकीय कार्यकर्त्यांची सोय**

शासनाच्या विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्याकरिता दरवर्षी ५० हजार युवकांना कार्यप्रशिक्षण देण्याची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेचा ऊहापोह करण्यात आलेला नसला तरी सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांची सोय लावण्याचा हा प्रकार असल्याची कुजबूज मंत्रालयात होती. या योजनेत पैसे किती देणार याचा उल्लेख नसला तरी विद्यावेतनाएवढेच १० हजार रुपये दिले जाण्याची शक्यता आहे.

**पेट्रोलडिझेल स्वस्त**

मुंबई, नवी मुंबई व ठाण्यातील डिझेलवरील सध्याच्या २४ टक्क्यांचा कर तीन टक्क्यांनी कमी करून २१ टक्के करण्याचा तसेच पेट्रोलवरील कर २६ टक्क्यांवरून २५ टक्के करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. यामुळे मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईतील पेट्रोल प्रति लिटरला ६५ पैसे तर डिझेल दोन रुपये सात पैशांनी स्वस्त होईल, असे अर्थमंत्र्यांनी जाहीर केले. मुंबई, ठाणे व नवी मुंबई ही तीन शहरे वगळता राज्यात अन्यत्र इंधनाच्या दरात फरक पडणार नाही.

**'लाडकी बहीण' योजना**

मध्य प्रदेशच्या धर्तीवर महाराष्ट्रातही जुलै महिन्यापासून 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना राबवण्यात येणार आहे. २१ ते ६० वयोगटातील पात्र महिलांना दरमहा दीड हजार रुपये भता दिला जाईल. मात्र, त्यामध्ये कुटुंबाच्या उत्पन्नमर्यादेची अट ठेवण्यात आली आहे.

**अन्य महत्त्वाच्या घोषणा**

शेतकऱ्यांच्या ७.५ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या शेतीपंपांना पूर्णत: मोफत वीज पुरवठा.

मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजने'अंतर्गत दरवर्षी १० लाख तरुण-तरुणींना प्रत्यक्ष कामावरील प्रशिक्षण म्हणून दरमहा १० हजार रुपयांपर्यंत विद्यावेतन

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना राज्यातील सर्व कुटुंबांसाठी लागू.

## आजचा अर्थसंकल्प राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी महत्वाचे पाऊल-आ. किशोर जोरगेवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आज राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात महिला सक्षमीकरण, दुर्बल घटक, शेतकरी, विद्यार्थी, कृषी क्षेत्रातील सुधारणा, शिक्षण आणि कौशल्य विकास, आरोग्यसेवा, पायाभूत सुविधा, उद्योग, रोजगार आणि पर्यावरण संरक्षण या विषयांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. हा अर्थसंकल्प राज्याला सर्वांगीण विकासाची दिशा देणारा आणि राज्याच्या आर्थिक प्रगतीकडील महत्वपूर्ण पाऊल ठरेल, अशी प्रतिक्रिया चंद्रपूरचे अपक्ष आमदार किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केली आहे.



राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी आज सभागृहात राज्याचा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर केला आहे. या अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना आ. जोरगेवार म्हणाले की, राज्य सरकार मुख्यमंत्री लाडकी बहिन योजना राबविणार आहे. या अंतर्गत २१ ते ६० वयोगटातील पात्र महिलांना दरमहा दीड हजार रुपये दिले जाणार आहेत. शुभमंगल सामूहिक विवाह योजनेच्या अनुदानाची रक्कमही १० हजाराहून २५ हजार करण्यात आली आहे. या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण तरतूद केली गेली आहे. युवा वर्गासाठीही विविध योजना सरकारने सुरू केल्या आहेत. दुर्बल घटकांनाही न्याय देण्याचे काम अर्थसंकल्पाच्या माध्यमातून करण्यात आले आहे. दिव्यांग बांधवांसाठी धर्मवीर आनंद दिघे घरकुल योजना सुरू करण्यात आली आहे. पायाभूत सुविधा आणि अन्य क्षेत्रातही मोठ्या निधीची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. या अर्थसंकल्पाने सर्व समाजघटकांना दिलासा दिला आहे. राज्याच्या सर्वांगीण विकासाची दिशा ठरवणारा हा अर्थसंकल्प निश्चितच प्रशंसनीय आहे. यामुळे राज्याची आर्थिक स्थिती सुधारेल आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा होईल, असे आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे.

## शिंदे प्रशासकीय सेवा महाविद्यालय परिसरात आंतरवासिता कक्ष स्थापन



**वरोरा । प्रतिनिधी**

भद्रावती शिक्षण संस्था भद्रावती द्वारा संचालित कै. निळकंठराव शिंदे प्रशासकीय सेवा महाविद्यालय वरोरा तथा डॉ. विवेक शिंदे प्रशासकीय सेवा महाविद्यालय भद्रावती येथे आंतरवासिता कक्ष स्थापन करण्यात आला.

चालू सत्रात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण उपक्रम अंतर्गत प्रत्येक महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना उद्योग व शिक्षण संबंध कळावा या दृष्टिकोनातून आंतरवासिता कक्ष स्थापन करण्यास सांगण्यात आला होता. त्याची सुरुवात वरोरा येथील उद्योजक रमेश राजुरकर यांच्याशी महाविद्यालयीन प्राचार्य गुरुदेव जुमडे प्राचार्य प्रमोद पाठक यांनी प्रत्यक्ष भेट घेतली व चर्चात्मक स्वरूपात त्याची रूपरेखा कसी राहील व विद्यार्थ्यांना यामधून कोणत्या गोष्टी प्राप्त होतील याची चर्चा झाली आणि कक्ष स्थापन करण्यास अनुमती मिळाली. या उपक्रमाची खरी भूमिका भद्रावती शिक्षण संस्था भद्रावती चे अध्यक्ष डॉ. विवेक निळकंठराव शिंदे,तसेच भद्रावती शिक्षण संस्था भद्रावतीचे सचिव डॉ. कार्तिक निळकंठराव शिंदे यांच्या प्रयत्नातून ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

## अर्थसंकल्प सादर करताना सरकारने सर्वसमावेशक बाबींचा विचार करणे आवश्यक होते-सुधाकर अडबाले

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्याचे शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी अखेरचा अर्थसंकल्प विधान परिषदेत सादर केला. यात केवळ आगामी निवडणूक डोळ्यासमोर ठेवून मुलींना शिक्षणशुल्क आणि परीक्षा शुल्क माफ देण्याचा निर्णय घेतला. ग्रामीण भागातील शाळांचा विकास आणि शिक्षकांच्या समस्या सोडविण्यासाठी कुठलीही तरतुद करण्यात आलेली नाही, अशी टीका नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार सुधाकर अडबाले यांनी केली.



अर्थसंकल्प सादर करताना सरकारने सर्वसमावेशक बाबींचा विचार करणे आवश्यक होते. राज्यातील व्यावसायिक शिक्षणात मुलींची संख्या वाढविण्यासाठी अभियांत्रिकी, वास्तूशास्त्र, वैद्यकीय तसेच कृषीविषयक अभ्यासासाठी प्रवेशित ८ लाखांपर्यंत उत्पन्न असलेल्या इतर मागासवर्ग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना शिक्षणशुल्क आणि परीक्षा शुल्क माफ करण्यात येणार आहे. मात्र, दुर्गम भागातील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली नाही. शाळांची दुरवस्था, शिक्षक - कर्मचाऱ्यांची अनेक देयके थकीत आहेत. त्यासाठी कोणतीही तरतूद ह्या अर्थसंकल्पात करण्यात आलेली नाही.

## छत्रपती शिवाजी महाराजांना अपेक्षित रयतेचं राज्य व कल्याणकारी संकल्पना साकार करणारा अर्थसंकल्प-ना.सुधीर मुनगंटीवार

### विरोधकांच्या टिकेला आणि खोट्या प्रचाराला आता जनता बळी पडणार नाही

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र हा देशात नेहमी आर्थिक क्षेत्रात प्रथम क्रमांकावर राहिला आहे. उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांनी आज मांडलेल्या अतिरिक्त अर्थसंकल्पातून शेवटच्या व्यक्तीपर्यंत मदतीचा आधार देणाऱ्या योजना प्रस्तावित केल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या रयतेचं राज्य व कल्याणकारी संकल्पना साकार करणारा हा अर्थसंकल्प आहे.



या अर्थसंकल्पावर विस्तृत प्रतिक्रिया देताना ना. सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, ना.अजितदादा पवार यांनी आज विधिमंडळात मांडलेला अर्थसंकल्प लोकाभिमुख आणि कल्याणकारी असून राज्यातील विकासकामे व विविध योजना पुढे घेऊन जाणारा आहे. माजी अर्थमंत्री म्हणून मी या अर्थसंकल्पाचे स्वागत करतो. या अर्थसंकल्पातून शासनाने शेवटच्या व्यक्तीपर्यंत मदतीचा आधार देणाऱ्या योजना प्रस्तावित केल्या आहेत. विशेष करून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेअंतर्गत राज्यातील अडीच कोटी महिलांना दरमहा १५०० रुपये थेट त्यांच्या खात्यात प्राप्त होणार असून देशातील ही सर्वात मोठी योजना आहे. यासोबतच पुरोगामी म्हटल्या जाणाऱ्या महाराष्ट्रातील महिलांचे शिक्षण सुलभ आणि सहज व्हावे या दृष्टीने आर्थिक निकष पूर्ण करणाऱ्या महिलांना शिक्षणात १०० टक्के सवलत देण्याचा क्रांतिकारी निर्णय देखील या अर्थसंकल्पात घेण्यात आला आहे. १४,७०० कोटी रुपयांचे अनुदान देत ४० लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणाऱ्या विजेत शंभर टक्के सूट जाहीर केल्याने छत्रपती शिवाजी महाराजांच्या रयतेच्या राज्याच्या संकल्पनेला गती प्राप्त होणार आहे. रायगड येथील शिवराज्याभिषेक सोहळा आता शासनाच्या माध्यमातून दर वर्षी साजरा करण्यात येणार ही घोषणा शिवप्रेमी मध्ये चैतन्य आणि उत्साह भरणारी आहे. याशिवाय राज्यातील महिलांना, बेरोजगार युवक तसेच विद्यार्थ्यांना दरमहा अनुदान देण्याची, गॅस सिलिंडर मोफत देण्याची घोषणा, सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना जाहीर केलेले अनुदान या सर्व योजना अभिनंदनीय आहेत.सांस्कृतिक कार्य विभाग, वन विभाग आणि मत्स्यव्यवसाय विभागांसाठी या अर्थसंकल्पात केलेल्या वित्तीय तरतूदी या समाधानकारक असून त्यातून हाती घेतलेल्या योजना नक्कीच पूर्ण होतील, असेही ना. सुधीर मुनगंटीवार यांनी प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले.या अर्थसंकल्पामुळे विरोधी पक्ष विचलित होऊन, त्यांच्याकडून दोष काढण्याचा केविलवाणा प्रयत्न केला जाईल; परंतु राज्यातील जनता त्यांच्या या खोट्या प्रचाराला बळी पडणार नसून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या संकल्पनेतील रयतेच्या हितार्थ निर्णय घेत असलेल्या या सरकारच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील असा मला विश्वास आहे.

# चिखल आणि नवनिर्माण कला!

**चिखल म्हणजे चिकणमाती, गाळ किंवा पाण्यात मिसळलेली चिकणमाती होय. हे सहसा पावसानंतर किंवा पाण्याच्या स्त्रोतांजवळ तयार होते. प्राचीन मातीचे साठे भूगर्भीय कालांतराने घट्ट होऊन शेल किंवा मडस्टोन– ल्युटाइट्स सारखे गाळाचे खडक तयार करतात. जेव्हा भूगर्भीय चिखलाचे साठे मुहानांमध्ये तयार होतात, तेव्हा परिणामी थरांना बे मड्स म्हणतात. मातीचा वापर बहुतेक घरांसाठी बांधकाम संसाधन म्हणून, जसे कवेलू, विटा, गारा आदी शतकानुशतके केला जातो आणि बाईंडर म्हणून देखील वापरला जातो.**



छी, छी, छीऽऽऽ..! चिखल हे एक उपद्रव वाटत आहे, नाही का? पाऊस पडताच सर्वत्र चिखल होतो आणि अक्षरशः सर्वत्र चिखल होतो. या निसरड्या, चिकट घाणेरड्या पदार्थाचे कोणतेही फायदे नक्कीच नाहीत, बरोबर? चुकीचे. आणि आंतरराष्ट्रीय चिखल दिनाचे निर्माते ते सिद्ध करण्यासाठी बाहेर आहेत! शेवटी, चिखल हा घराबाहेरील भागांसाठी अतिशय महत्त्वाचा आहे आणि घराबाहेर म्हणजे ताजी हवा आणि व्यायाम, लोकांसाठी दोन सर्वोत्तम गोष्टी. आणि म्हणून जर आपण थोडे घाण झालो तर? बऱ्याच संशोधनातून असे दिसून आले आहे की विशिष्ट प्रमाणात जीवाणूंच्या संपर्कात येणे आपल्यासाठी चांगले आहे, कारण ते रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत करते, अक्षरशः निर्जंतुक वातावरणात राहण्याऐवजी, ज्यामुळे आपले शरीर खूप असुरक्षित होते. किती खनिजे चिखल करू शकतात हे सांगायला नको – लोक मड मास्क आणि स्पामध्ये आंघोळीसाठी शेकडो डॉलर्स देण्याचे एक कारण आहे. मग आपण कशाची वाट पाहत आहात? चला घाण करूया! कारण, आजीवन आपली चिखलाशी नाळ घट्ट जोडली आहे. संत तर सांगतात, की

मातीची रे काया तुझी;
अंती मातीमंदी जायाची।।

अमेरिकन वनस्पतिशास्त्रज्ञ ल्यूथर बरबँक यांनी म्हटले आहे, प्रत्येक मुलाकडे मातीचे पाईप, तृणधान्य, पाण्यातील बग, टॅडपोल, बेडूक, मातीची कासवे, जंगली स्ट्रॉबेरी, एकोर्न, चेस्टनट, झाडे चढण्यासाठी असावीत. वेडसाठी ब्रूक्समधमाश्या, फुलपाखरे, पाळीव प्राण्यांसाठी विविध प्राणी, गवताचे मैदान, पाइन-शंकू, खडक ते टोल, वाळू, साप आणि हॉर्नेट; यापासून वंचित राहिलेले कोणतेही मूल...शिक्षणाच्या सर्वोत्तम भागापासून वंचित राहिले आहे.

आंतरराष्ट्रीय चिखल दिनाचा इतिहास असा, की आंतरराष्ट्रीय चिखल दिवसाच्या निर्मात्यांना पृथ्वीवरील सर्व मुलांना एकमेकांच्या जवळ जाण्यास मदत करण्यासाठी एक मार्ग शोधायचा होताआणि पृथ्वीद्वारेच ते करण्याचा यापेक्षा चांगला मार्ग कोणता? आंतरराष्ट्रीय चिखल दिन सन २००९मध्ये एका जागतिक मंचाच्या कार्यक्रमात सुरू झाला, जेव्हा ऑस्ट्रेलियातील गिलियन मॅकऑलिफ आणि नेपाळमधील बिष्णू भट्टा समुदायाच्या भावनांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि आपल्या सभोवतालच्या



**संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली,**
**फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.**


जगाबद्दल कौतुक करण्याच्या मार्गांबद्दल बोलण्यासाठी एकत्र आले. त्यानंतरच्या सहकार्याने हॉलंड ते नेपाळ ते युनायटेड स्टेट्स पर्यंत जगभरातील शिक्षक, मुले आणि कुटुंबांना दरवर्षी २९ जून रोजी एकत्रितपणे आंतरराष्ट्रीय चिखल दिन साजरा करण्यासाठी प्रेरित केले. वय, वंश आणि धर्म याची पर्वा न करता, चिखलात झाकलेले, आम्ही सर्व एकसारखे दिसतो!

आंतरराष्ट्रीय चिखल दिवस कसा साजरा करायचा? तर आंतरराष्ट्रीय चिखल दिन साजरा करण्याचे असंख्य मार्ग आहेत, परंतु त्या सर्वांमध्ये एक गोष्ट समान आहे, तुम्हाला घाण करावी लागेल. जर तुमची मुले असतील तर हा दिवस विशेषतः मजेदार असू शकतो, कारण मुलांइतके गलिच्छ होणे कोणाला आवडते? आंतरराष्ट्रीय चिखल दिनानिमित्त सर्वात सर्जनशील आणि मजेदार क्रियाकलापांपैकी एक म्हणजे मातीची शिल्पे किंवा मड केक बनवणे. थोडे अधिक माती किंवा पाणी घालून तुम्ही वापरत असलेल्या चिखलाची सुसंगतता समायोजित करणे सोपे आहे, त्यामुळे प्रक्रियेत भरपूर निश्चित हास्य आणि दर्जेदार कौटुंबिक वेळेचा आनंद घेताना तुम्हाला जे बनवायचे आहे ते बनवणे सोपे असावे. या दिवसाचा पूर्ण आनंद लुटण्याचा आणखी एक सोपा मार्ग म्हणजे ब्लो-अप पूल वापरून घरगुती मातीचा खड्डा बनवणे. हे केवळ स्वस्तच नाही तर खरोखरच एक अनोखा अनुभव देखील देते. एकदा तुम्ही एक छोटासा ब्लो-अप पूल विकत घेतल्यावर तुम्हाला फक्त ते मातीने भरावे लागेल जे माती आणि पाण्याचे मिश्रण वापरून सहज भरता येईल जे तुमची मुले नंतर पसरू शकतात. फक्त तुम्ही तयार आहात याची खात्री करा. तुमचे कपडे सोलून काढल्यावर फेकून द्या, कारण ते कपडे पुन्हा स्वच्छ होतील असा कोणताही मार्ग नाही.

चिखल म्हणजे चिकणमाती, गाळ किंवा पाण्यात मिसळलेली चिकणमाती होय. हे सहसा पावसानंतर किंवा पाण्याच्या स्त्रोतांजवळ तयार होते. प्राचीन मातीचे साठे भूगर्भीय कालांतराने घट्ट होऊन शेल किंवा मडस्टोन- ल्युटाइट्स सारखे गाळाचे खडक तयार करतात. जेव्हा भूगर्भीय चिखलाचे साठे मुहानांमध्ये तयार होतात, तेव्हा परिणामी थरांना बे मड्स म्हणतात. मातीचा वापर बहुतेक घरांसाठी बांधकाम संसाधन म्हणून, जसे कवेलू, विटा, गारा आदी शतकानुशतके केला जातो आणि बाईंडर म्हणून देखील वापरला जातो. असा मानवी जीवनात चिखल खुपच महत्वाचा घटक आहे, हे विशेष! चला तर मग मस्तपैकी चिखल खेळुया...!!

!! जागतिक चिखल दिनानिमित्त सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# फिरकीच्या तालावर!




टी ट्वेंटी विश्वचषकाच्या दुसर्या उपांत्य सामन्यात टीम इंडियाने इंग्लंडचा धुव्वा उडवत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. मागील टी ट्वेंटी विश्वचषकात टीम इंडीयाला अपशकून करणाऱ्या इंग्लंड संघाचा पुरेपूर बदला घेत टीम इंडियाने विश्वचषकाकडे अंतिम पाऊल टाकले आहे. कर्णधार रोहीतने फलंदाजीत आपली दादागिरी कायम राखत इंग्लंडला आपल्या बॅटचे पाणी पाजले तर गोलंदाजीत अक्षर, कुलदीप द्वयीने अक्षरशः धुमाकूळ घालत इंग्रजांना आपल्या फिरकीच्या तालावर नाचवले. लो आणि स्लो पिचवर इंग्लंडच्या तडाखेबंद फलंदाजांनी नांगी टाकल्याने त्यांना ६८ धावांनी पराभव स्विकारावा लागला. फलंदाजी, गोलंदाजी आणि तुल्यबळ क्षेत्ररक्षणाला रोहीतच्या कल्पक नेतृत्वाची जोड मिळताच या स्पर्धेत एक अजेय संघ म्हणून टीम इंडिया नावारूपास आला आहे.

आपला संघ जरी जिंकला असला, अंतिम फेरीत धडकला असला तरी काही बाबींकडे अजिबात दुर्लक्ष करता येत नाही. सर्वात महत्वाचे म्हणजे विनिंग कॉम्बीनेशन बदलायचे नाही या अंधश्रद्धेतून बाहेर पडावे लागेल. विराटचे सलामीला विरजन टाकून बरेच दिवस झाले आहे. त्याची दाळ शिजत नाही वरण उकळत नाही अशी अवस्था झाली आहे. त्याशिवाय तो इतक्या वाईट पद्धतीने बाद होतो की एखाद्या टेल ऐंडरला सुद्धा त्यावर हसू फुटेल. बहुदा बीसीसीआयने क्रिकेट सोबतच बायो फर्टीलाइझर्स आणि कुटीर उद्योग चालू केले की काय अशी शंका येते. कारण ज्या प्रकारे विराटला सलामीला कुजवून त्याचे कंपोस्ट खत तर यशस्वी जैस्वाल आणि रिंकू सिंगचे लोणचे घातले जात आहे ते पाहता वरील शंका खर्या असाव्यात असे वाटते.

या सामन्याबाबत बोलायचे झाले तर रोहीत, विराट फलंदाजीला आल्यावर त्यांच्यावर सेंट ल्युसिया, कांगारू विरूद्धच्या लढतीचा हँगोव्हर स्पष्टपणे जाणवत होता. तिथे पिचवर चांगला बाऊंस होता तर इथे पिच लो अँड स्लो असल्याने गोलंदाजांविरूद्ध उठता लाथ बसता बुक्की देता येत नव्हते. विराट भुमीपूजन आटोपताच चालता झाला तरी रोहीतच्या मनातील इंग्लंडच्या बदले की आग काही कमी झाली नव्हती. रोहीतची स्ट्रॅटजी स्पष्ट होती. कोई साथ दे न दे चलना मुझे आता है, हर आग से वाकीफ हूं, जलना मुझे आता है. एकला चलोरे प्रमाणे त्याचे बॅट परजणे चालू होते. यासुद्धा सामन्यात रिषभ पंतने संदेसे आते है, संदेसे जाते है सारखी औपचारीकता पुर्ण केली, आला आणि मुकाट्याने परत गेला. गेल्या काही सामन्यात विराट, पंत ज्या सहजतेने बाद होत आहेत ते पाहता टीम इंडियाचे हे दोन्ही दिग्गज आपल्या नऊ फलंदाजांवर दोन फलंदाज फ्री बॅटींग करत आहे असे वाटते.

भलेही या संपुर्ण स्पर्धेत सूर्यदेव प्रत्येक संघाशी लपंडाव खेळत असला तरी कर्णधार रोहीतला यादवचा सूर्या प्रामाणिकपणे साथ देत आहे. रोहीतची तडाखेबंद तर सूर्याच्या ग्लॅमरस फलंदाजीची युगलबंदी पाहणे जबरदस्त अनुभव असते. या दोघांनी इंग्लिश गोलंदाजी सहज खेळून काढली. त्यातही त्यांचे सिनीअर सिटीझन फिरकीपटू मोईन अली, आदील रशीदचे त्यांनी फाजील लाड केले नाही. सूर्याने टॉप ऑर्डर, मिडल ऑर्डर आणि लोअर ऑर्डर मध्ये जी मिसिंग लिंक होती, त्याची पुर्तता केली. सूर्याने खेळपट्टीवर रमत आपल्या संघाला बळकटी दिली तर हार्दीक पांड्याने आपल्या छोटेखानी पण वेगवान खेळाने टीम इंडियाला वळकटी दिली.

इंग्लंडला अंतिम फेरीचे तिकीट १७१ धावांत मिळणार होते आणि त्याची जबाबदारी होती त्यांच्या टॉप ऑर्डरवर. त्यातही जॉस बटलर, सॉल्ट, जॉनी बेअरस्टो हे धडाकेबाज फलंदाज कधीही सामन्याची दशा, दिशा फिरवण्यात तरबेज होते. सोबतच एक दोन मोठ्या भागिदार्या सामना सहज पलटवू शकल्या असत्या. त्यातही लढाई मैदानातील असो की राजकीय, योद्धे दोनच असतात. ते म्हणजे वेळ आणि संयम. अर्शदीप बुमराहला यशस्वी तोंड दिल्यावर इंग्लिश कर्णधार बटलरने समोर फिरकीपटू अक्षरला पाहताच त्याच्या तोंडाला पाणी सुटले, त्याचा संयम सुटला. खरेतर पॉवर प्ले मध्ये बटलर साठी ते विणलेले जाळे होते. तू आया नहीं, तुझे बुलाया गया है, हे अक्षरला चांगले माहिती होते. शिवाय या पिचवर विकेट टू विकेट, गुडलेंथ गोलंदाजी म्हणजे एक तो करेला, उपरसे नीम चढा होते.

जी चुकी १९८७ रिलायन्स विश्वचषक अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलिया विरूद्ध माईक गॅटींगने ॲलन बॉर्डरला रिव्हर्स स्विप मारून केली, तिच चुकी बटलरने केली. बटलर बाद होताच इंग्लंड संघाचा पोळा फुटला. अक्षर आला रे आला म्हणताच इंग्लिश फलंदाज फिरकीच्या तालावर घुमर डान्स करू लागले. त्यातही बुमराहने एक ही मारा सॉलीड मारा सारखे पीटर सॉल्टची फलंदाजी अळणी, बेचव करून टाकली. बटलर सॉल्ट परतताच सेमीफायनल, स्पिनच्या दडपणात इंग्लंड फलंदाजीचे मनोरे कोसळू लागले. त्यात मोईन अलीची विकेट पाहण्या सारखी होती. खरेतर ही विकेट पंतच्या खात्यात जमा व्हायला हवी. ज्याप्रकारे पंतने समयसुचकता दाखवत मोईन अली ला मामा बनवले, यष्टीचीत केले, ते पाहता पंतचे फलंदाजीतील अपयश माफ करायला हवे.

दहा षटकाच्या आत अर्धा इंग्लिश संघ तंबूत परतला होता. मागच्या सामन्यात जी निराशा, जी उद्विग्नता, जी भिती पॅट कमिन्सच्या चेहर्यावर झळकत होती, तिच या सामन्यात लिविंगसिटेन अँन्ड कंपनीच्या चेहर्यावर झळकत होती. कोणताही फलंदाज खेळपट्टीवर उभा राहू शकला नाही. अक्षरची बारी संपताच कुलदीपने इंग्लिश गोटात हाहाकार माजवला. बॅझबॉलचे बाळकटू प्यालेले उंच धिप्पाड इंग्लिश फलंदाज कुलदीप पुढे लोटांगण घालू लागले होते. याच रणधुमाळीत अखेरचा स्पेशलीस्ट फलंदाज लिविंगस्टोन धावबाद होताच इंग्लंडची धडपड थांबली. भलेही जोफ्रा आर्चरने इंग्लंड संघात प्राण फुंकण्याचे प्रयत्न केले परंतु डेड बॉडीला सिपीआर देऊन तसाही काही फायदा नसतो.

या सामन्यात सर्वात जर कोणती गोष्ट उठून दिसली तर ते रोहीतचे नेत्रुत्व! दुबेच्या पहिले पांड्याला फलंदाजीला पाठवणे असो की चौथे षटक अक्षरला देणे असो, ह्या दोन्ही चाली उपयुक्त ठरल्या. तर कुलदीप, जडेजाला मधात आणून हार्दीकला गोलंदाजीत थांबवून ठेवणे योग्य ठरले. आता अंतिम सामन्यात आपली गाठ द.आफ्रिकेशी आहे. विराटला पुन्हा एकदा सलामीला पाठवायचे की रोहीतने यशस्वी जैस्वालसोबत डावाचा प्रारंभ करायचा याबाबत विचारमंथन होणे गरजेचे आहे. सोबतच शिवम दुबे आपला प्रभाव पाडण्यात फारसा यशस्वी ठरला नाही याचाही विचार करावा लागेल. आयसीसी ट्रॉफीचा दुष्काळ संपवायचा असेल तर संघ व्यवस्थापनाला काही कटू निर्णय घ्यावे लागले तर ते त्यांनी जरूर घ्यावे. मात्र इतक्या वर्षांनी आलेल्या संधीचे सोने करावे हीच तमाम क्रिकेट रसिकांची कामना आहे.

**डॉ.अनिल पावशेकर**
**मो. ९८२२९३९२८७**

## चिमूर येथे सुरू होणार 'विद्यार्थी सुविधा केंद्र'

# आ.सुधाकर अडबाले यांनी बैठकीत दिलेल्या निर्देशाची तात्काळ दखल

**गडचिरोली । प्रतिनिधी**



गोंडवाना विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास साधण्यासाठी व विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी चिमूर येथे विद्यार्थी सुविधा केंद्र सुरू होणार आहे. २० जून रोजी गोंडवाना विद्यापीठात आमदार सुधाकर अडबाले यांनी घेतलेल्या सभेत याबाबत तात्काळ सुविधा केंद्र सुरू करावे, असे निर्देश दिले होते. त्यानुसार विद्यापीठाने दखल घेऊन २९ जून रोजी सुविधा केंद्राचा उद्घाटन सोहळा पार पडणार आहे.

गोंडवाना विद्यापीठांतर्गत चंद्रपूर जिल्ह्याच्या टोकावर असलेल्या व विद्यापीठापासुन लांब असलेल्या चिमूर तालुक्यातील आणि परिसरातील विद्यार्थ्यांच्या व महाविद्यालयाच्या सोयीकरिता विद्यापीठाचे सुविधा केंद्र चिमूर येथे स्थापन करावे, अशी गोंडवाना विद्यापीठ यंग टीचर्स असोसिएशन व गोंडवाना विद्यापीठाच्या संबंधित असलेल्या इतर प्राध्यापक संघटना तसेच सिनेट सदस्यांच्या मागणीनुसार अधिसभेने मान्यता दिलेली होती. परंतु, दिड वर्ष उलटून ही विद्यापीठाने चिमूर येथे सुविधा केंद्र निर्माण न केल्याने दि. २० जून २०२४ ला आमदार सुधाकर अडबाले यांनी गोंडवाना विद्यापीठात घेतलेल्या सभेत सुविधा केंद्र तात्काळ सुरू करण्याचे विद्यापीठास निर्देश दिले होते. त्यानंतर विद्यापीठाने यावर तात्काळ दखल घेत चिमूर येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्यालय चिमूर येथे सुविधा केंद्राची निर्मिती केली जाणार आहे. सुविधा केंद्राचा उद्घाटन सोहळा २९ जून रोजी दुपारी ४ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. विद्यार्थी व शिक्षक हीत जोपासणारे नागपूर विभागाचे शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांच्या कार्यामुळे चिमूर परिसरातील विद्यार्थी, महाविद्यालयांना सुविधा केंद्राचा लाभ होईल. यामुळे आमदार अडबाले यांचे आभार मानण्यात येत आहे.

# न्यू इंग्लिश स्कूल सांगोला मध्ये राजर्षी शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

**सांगोला । प्रतिनिधी**



न्यू इंग्लिश स्कूल सांगोला मध्ये राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस उपमुख्याध्यापक प्रा.संजय शिंगाडे यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून राजर्षी शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी व्यासपीठावर न्यू इंग्लिश स्कूल चे मुख्याध्यापक प्रा. केशव माने, पर्यवेक्षक तानाजी सूर्यगंध सर,दशरथ जाधव सर,तात्यासाहेब इमडे सर सांस्कृतिक विभाग प्रमुख स्मिता इंगोले मॅडम, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आपल्या मनोगतात बोलताना पर्यवेक्षक तानाजी सूर्यगंध यांनी सांगितले की,बहुजन समाज सुशिक्षित झाल्याशिवाय त्यांचा उद्धार होणार नाही. त्यांच्या मागासलेपणाचे एक महत्त्वाचे कारण त्यांच्यातील शिक्षणाचा अभाव होय ही गोष्ट शाहू महाराजांनी ओळखून बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार करण्याचे ठरविले.१९०२ मध्ये राजर्षी शाहूंनी आपल्या राज्यातील सरकारी नोकऱ्यांत मागास वर्गांसाठी पन्नास टक्के जागा राखून ठेवण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला.आपल्या राज्यात अस्पृश्यता पाळली जाऊ नये म्हणून शाहू महाराजांनी जाणीवपूर्वक लक्ष दिले. अस्पृश्यांना शाळा, दवाखाने, पाणवठे, सार्वजनिक विहिरी इत्यादी ठिकाणी समानतेने वागवावे, असे आदेश त्यांनी काढले.सदरच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख स्मिता इंगोले मॅडम यांनी केले तर आभार प्रसिद्धीप्रमुख किरण पवार सर यांनी मानले.

# मुख्य प्रवाहात कायम रहा-नारायण काळे

**वालचंदनगर । प्रतिनिधी**

पळसदेव ग्रामीण भागात कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी भविष्य काळात शहरातून पंच बोलावण्याची आवश्यकता भासणार नाही.मात्र या वेळी परीक्षा दिलेल्या पंचांनी पुढील काळात कार्यरत राहणे आवश्यक आहे. परीक्षा देऊन घरी बसू नका . मुख्य प्रवाहात कायम रहा असे मत राष्ट्रीय पंच नारायण काळे यांनी व्यक्त केले.

पळसदेव तालुका इंदापूर येथे एस बी स्पोर्ट शिंदे वस्ती येथे दिनांक २२ जून ते २३ जून या दरम्यान जिल्हास्तरीय पंच परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नारायण काळे बोलत होते. इंदापूर तालुक्यात तब्बल दहा वर्षानंतर प्रथमच ग्रामीण भागात जिल्हास्तरीय कबड्डी पंच परीक्षा आयोजित करण्यात आली होती . या वेळी इंदापूर ,बारामती ,दौंड ,पुरंदर ,शिरूर , भोर या तालुक्यातून परीक्षेसाठी पंच उपस्थित होते.या वेळी सुमारे ३५ पंचांनी परीक्षा दिली.असल्याची माहिती एसबी स्पोर्ट चे अध्यक्ष सागर बनसुडे यांनी दिली. जिल्हास्तरीय पंच परीक्षेसाठी पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशन जॉईन सेक्रेटरी संदीप पायगुडे , कार्यवाह योगेश यादव , राष्ट्रीय पंच नंदकुमार काळोखे , नारायण काळे , राज्य उत्पादन शुल्क माजी निरीक्षक तानाजी शिंदे ,पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशन सदस्य सतपाल गावडे , शंभु भोपळे , चंद्रकांत रणवरे एसबी स्पोर्ट चे अध्यक्ष सागर बनसुडे , रुपेश भालेराव विलास शेलार सह कबड्डी प्रशिक्षक उपस्थित होते.

# गोंडवाना विद्यापीठ आणि हिंदू धर्म संस्कृती मंदिर यांच्यातील सामंजस्य करारातून भारतीय ज्ञान परंपरेला चालना मिळणार-कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे

**गडचिरोली । प्रतिनिधी**

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली आणि हिंदू धर्म संस्कृती मंदिर, नागपूर यांच्यातील सामंजस्य करारामुळे भारतीय ज्ञान परंपरेच्या अभ्यासाला आणि संशोधनाला मोठी संधी मिळणार आहे. या करारानुसार, विद्यापीठातील विद्यार्थी आणि संशोधक हे नागपूर येथील हिंदू धर्म संस्कृती मंदिरातील ४० हजारपेक्षा जास्त प्राचीन ग्रंथांचा आणि हस्तलिखितांचा अभ्यास करू शकतील. या करारामुळे विद्यार्थ्यांना प्राचीन भारतीय साहित्य, संस्कृती आणि ज्ञान परंपरेवर संशोधन करण्यासाठी एक उत्तम संधी उपलब्ध होईल. तसेच, हिंदू धर्म आणि संस्कृतीचा सखोल अभ्यास करणे शक्य होईल. त्यामुळे या सामंजस्य करारातून भारतीय ज्ञान परंपरेला चालना मिळणार असल्याचे प्रतिपादन गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे यांनी केले.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली आणि हिंदू धर्म संस्कृती मंदिर, नागपूर यांच्यामध्ये सांमजस्य करार करण्यात आला, याप्रसंगी ते बोलत होते.



यावेळी, प्र-कुलगुरु डॉ. श्रीराम कावळे, कुलसचिव डॉ. अनिल हिरेखन, अधिष्ठाता डॉ. अमुदाला चंद्रमौली, हिंदू धर्म संस्कृती मंदिराचे अध्यक्ष श्री. मनोज वाघ, विश्वस्त श्री. प्रसन्न चितळे, डॉ.सुधाकरराव इंगळे, ज्ञान स्त्रोत केंद्राच्या संचालक डॉ.रजनी वाढई तसेच प्राध्यापक डॉ. विवेक जोशी, डॉ.देवदत्त तारे, डॉ.नंदकिशोर माने, डॉ. प्रफुल नांदे, डॉ. प्रिया गेडाम, श्री. संदीप कागे, डॉ. वैभव मसराम, श्री. अतुल गावस्कर, डॉ. हेमराज निखाडे तसेच कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

करारामध्ये दोन्ही संस्था परस्पर हित असलेल्या क्षेत्रात संयुक्त संशोधन करतील. विद्यापीठ आणि मंदिर एकमेकांना शैक्षणिक संसाधने प्रदान करतील. दोन्ही संस्थांच्या संशोधकांचा आदान-प्रदान कार्यक्रम राबविला जाईल. संयुक्तरीत्या परिषदा, कार्यशाळा, चर्चासत्र, परिगोष्ठी आणि स्पर्धांचे आयोजन केले जाईल. विद्यार्थ्यांना विद्यापीठांमध्ये घेतलेल्या अभ्यासक्रमांचे श्रेयांकाचे हस्तांतरण करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल तसेच गोंडवाना विद्यापीठाच्या धोरणानुसार, हिंदू धर्म संस्कृती मंदिराला त्यांच्या प्रकाशनांसाठी आर्थिक सहकार्य प्रदान केले जाईल. यामुळे मंदिराला त्यांच्या मौल्यवान ग्रंथांचे जतन आणि प्रकाशन करण्यासाठी मदत मिळणार आहे.

विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे यांच्या प्रमुख उपस्थितीत व्यवस्थापन सभागृह येथे सदर सांमजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. गोंडवाना विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव तसेच हिंदू धर्म संस्कृती मंदिरच्या वतीने अध्यक्ष श्री. मनोज वाघ यांनी स्वाक्षरी केली. सामंजस्य कराराची भूमिका श्री. मनोज वाघ यांनी मांडली. हिंदू धर्म संस्कृती मंदिराच्या स्थापनेचे उद्दिष्ट व आढावा सांगून दुर्गम भागातील संशोधक विद्यार्थ्यांना या प्राचीन ग्रंथाचा लाभ मिळेल या प्रेरणेतून हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाचे संचालन ज्ञान स्त्रोत केंद्राच्या संचालिका डॉ. रजनी वाढई तर आभार हिंदू धर्म संस्कृती मंदिरचे विश्वस्त डॉ. सुधाकरराव इंगळे यांनी केले.या करारामुळे विद्यार्थ्यांना आणि संशोधकांना प्राचीन भारतीय ज्ञानाचा अभ्यास करण्याची एक उत्तम संधी उपलब्ध होणार आहे. तरी सर्वांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन गोंडवाना विद्यापीठातर्फे करण्यात येत आहे.

# राजर्षी शाहू महाराजांना एडिटर अँड प्रेस रिपोर्टर असोसिएशनच्या वतीने अभिवादन

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

माझे राज्य गेले तरी बेहत्तर पण अस्पृश्य उद्धाराचे कार्य थांबविणार नाही. असे म्हणणारे राजर्षी शाहू महाराज. राजर्षी या पदवीला स्वकर्तुत्वाने सार्थ ठरविणारे आणि आपण छत्रपतींचे वंशज असून लोककल्याण हीच आपली जबाबदारी अशा भावनेतून राज्यकारभार करणारे छत्रपती शाहू महाराज. यांची आज २६ जून रोजी जयंती होती. त्यानिमित्ताने

ज्ञानहितवादी राजश्री शाहू महाराज यांना १५० व्या जयंती दिनानिमित्त, एडिटर अँड प्रेस रिपोर्टर असोसिएशनच्या वतीने मिल कॉर्नर या ठिकाणी राजर्षी शाहू महाराजांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष रतनकुमार साळवे, संघटनेचे सल्लागार, जिल्हा माहिती अधिकारी, एस के बावस्कर, सचिव, संजय सोनखेडे, दैनिक राजनिष्ठाचे संपादक, मनीष अग्रवाल, फिरोज खान, रवी रत्नपारखे,प्रकाश पगारे, सलीम काजी, उत्तमराव गायकवाड,पवन पाखरे, अण्णासाहेब काळे,राहुल जाधव,अनिल जाधव, कपिल नाडे, कैलास गायकवाड, रणयेवले दिलीप म्हस्के आदि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# निराधार योजना लाभार्थ्यांच्या खात्यात थेट डीबीटीमार्फत जमा होणार अनुदान

## १० जुलैपर्यंत आवश्यक कागदपत्रे जमा करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी**

शासनाच्या विशेष सहाय्य कार्यक्रमातर्गत राबविण्यात येणाऱ्या राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना अंतर्गत लाभार्थ्यांना दरमहा वितरीत करावयाचे मानधन तहसिल कार्यालयातील संजय गांधी योजना विभागामार्फत बँकेला पाठवून संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यात वर्ग केले जात होते. मात्र आता शासनामार्फत सदर अर्थसहाय्याचे वितरण हे डी.बी.टी. पोर्टलच्या माध्यमातुन निराधारांच्या थेट खात्यात वर्ग केले जाणार आहे. त्यामुळे वयोवृध्द लाभार्थ्यांना अनुदानासाठी बँकात खेटे घालावे लागणार नाही. आता डी.बी.टी. पोर्टलद्वारे निराधारांचे अनुदान थेट बँक खात्यात मिळणार असल्याने निराधारांची हेळसांड थांबुन बँक कर्मचाऱ्यांची कसरत थांबणार आहे.

त्यासाठी या दोन्ही योजनांचा लाभ घेत असलेल्या पात्र निराधारांकडून खालील दिलेल्या कागदपत्रे संकलित करण्याची प्रक्रिया जिल्ह्यातील सर्व ८ तालुक्यांतील संजय गांधी योजना विभागांकडून सुरु करण्यात आलेली आहे. याबाबत गावस्तरावरुन तलाठ्यांना आवश्यक त्या सूचना देऊन संबंधितांना कळविले जात आहे. सर्व राज्य पुरस्कृत योजनेच्या लाभार्थी यांनी दि. १० जुलै २०२४ पर्यंत खालील कागदपत्रे जमा करावेत. यासाठी लाभार्थी यांनी स्वत: तहसिल कार्यालयात उपस्थित राहणे आवश्यक नाही त्यामुळे स्वत: लाभार्थी यांनी तहसिल कार्यालयात येवून गर्दी न करता आपले गावातील तलाठी/कोतवाल यांचेमार्फत किंवा घरातील इतर सदस्यांमार्फत कागदपत्रे जमा करावीत. पुढील कागदपत्रे जमा करणे आवश्यक आहे - अद्यावत आधारकार्ड (ई-आधार), हयात असलेले प्रमाणपत्र, बँकेचे पासबुक, मोबाईल क्रमांक, दिव्यांग प्रमाणपत्र (असल्यास), मृत्यू प्रमाणपत्र (विधवा लाभार्थ्यांसाठी), परित्यक्त्या/ घटस्फोटीत/दुर्धर आजाराचे प्रमाणपत्र. सदरील कागदपत्रे मुदतीत जमा करावे जेणेकरुन डी.बी.टी. पोर्टलद्वारे आपणांस नियमीत अनुदान वितरण करण्यात येईल. अधिक माहितीकरीता संबंधीत तहसिलदार/नायब तहसिलदार संगायो यांचेशी संपर्क करावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी सोहम वायाळ यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# पुढील 3-४ दिवस मुसळधार पावसाचा इशारा विदर्भात

**मुंबई (वृत्तसंस्था)**

पुढील तीन ते चार दिवसात राज्यात मुसळधार पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. त्या पार्श्वभूमीवर हवामान खात्याकडून कुठे ऑरेंज तर कुठे यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. आज विदर्भातील काही जिल्ह्यात पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तर मुंबई, ठाण्यासह मराठवाडा आणि उत्तर आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक भागातही पावसाची शक्यता आहे.हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, आज विदर्भातील काही जिल्ह्यात पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. या भागात आज अति मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. विदर्भातील गडचिरोली, यवतमाळ आणि अमरावती या जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. या पावसाच्या पाश्र्भूमीवर नागरिकानी योग्य ती खबरदारी घ्यावी असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.दरम्यान, आज कोकणासह पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

# नूतन विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी कार्यभार स्वीकारला

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

नूतन विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आज आपल्या पदाचा कार्यभार स्विकारला. प्रभारी विभागीय आयुक्त जगदिश मिनीयार यांच्याकडून त्यांनी पदभार स्विकारला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, उपायुक्त जगदिश मिनीयार यांनी श्री गावडे यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

यावेळी जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता विजय घोगरे, उपायुक्त अनंत गव्हाणे, नयना बोंदार्डे, सुरेश वेदमुथा, लीस पोरे, डॉ. सिमा जगताप, विभागीय कृषी सहसंचालक डॉ. तुकाराम मोटे यांच्यासह प्रादेशिक विभागप्रमुख उपस्थित होते. विभागीय आयुक्त श्री गावडे यांनी विभाग प्रमुखांशी संवाद साधला. मराठवाडयातील शेती, टंचाई तसेच सामाजिक विषयांबाबत त्यांनी माहिती जाणून घेतली. मराठवाडयातील शेती, टंचाईस्थिती तसेच सामाजिक सलोखा राखण्यासाठी सर्व मिळून समन्वयाने काम करूया, असेही ते म्हणाले.

श्री.गावडे हे १९९० मध्ये महसूल विभागात उपजिल्हाधिकारी पदावर रूजू झाले होते. वाई येथे प्रांत अधिकारी, पुणे येथे राजशिष्टाचार विभागात उपजिल्हाधिकारी, भूसंपादन अधिकारी, सातारा येथे जिल्हा पुरवठा अधिकारी, सांगली येथे निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे मनपा अतिरिक्त आयुक्त, विदर्भात एमआयडीसीचे सीईओ पदावर त्यांनी काम केले आहे.

सन २००७ मध्ये त्यांना आयएएस पदावर बढती मिळाल्यानंतर गोंदिया जि. प. सीईओ, अहिल्यादेवीनगर येथे मनपा आयुक्त, नाशिक येथे आदिवासी विकास विभागाचे अतिरिक्त आयुक्त, पर्यटन विभागाचे संचालक व मानवी हक्क संरक्षण विभागाचे सदस्य सचिव या पदावरही त्यांनी काम केले आहे.




नुतन विभागीय आयुक्त श्री. दिलीप गावडे यांनी पदभार स्विकारल्या नंतर शुभेच्छा देताना जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

# ऐतिहासिक भव्य अश्व रिंगण सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात-स्वागताध्यक्ष नंदकिशोर मुंदडा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथे गेल्या अनेक वर्षापासून आयोजित करण्यात येणाऱ्या संतश्रेष्ठ नामदेव महाराज तसेच संतश्रेष्ठ जनाबाई आणि इतर पालख्यांचा भव्य अश्वरिंगण सोहळा शनिवार दिनांक ६ जुलै २०२४ रोजी आयोजित करण्यात आला असून या अश्वरिंगण सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे. या सोहळ्याचा आनंद या पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन संयोजक व स्वागताध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी केले आहे.

अशा प्रकारचा अश्वरिंगण सोहळा मराठवाड्यामध्ये आषाढी यात्रेनिमित्त संपन्न होणारा हा पहिलाच गोल अश्व रिंगण सोहळा आहे. याशिवाय रिंगण सोहळ्याला एक वेगळी पार्श्वभूमी आहे. हा सोहळा नसून वारकरी संप्रदायातील श्रेष्ठ अशा गुरु-शिष्यांच्या भेटीचा योग आहे. भागवत संप्रदायामध्ये आद्य अभंग रचयीता म्हणून संत श्रेष्ठ नामदेव महाराजांची ओळख आहे. संत श्रेष्ठ नामदेव महाराजांनी भागवत धर्माची पताका सर्वदूर पसरवली. अखंड भारतामध्ये संतश्रेष्ठ नामदेव महाराजांनी भागवत धर्माच्या प्रचार आणि प्रसारासाठी अखंडितपणे काम केलं. शीख धर्मातील सर्वश्रेष्ठ गुरु ग्रंथसाहिब या ग्रंथामध्ये संत श्रेष्ठ नामदेव महाराजांच्या रचना समाविष्ट आहेत यावरून त्यांचं थोरपण लक्षात येऊ शकेल. भागवत धर्मामध्ये सर्व जाती-धर्माच्या संतांनी भक्तीचा पाया मजबूत करण्यासाठी प्रयत्न केलेला आहे. सर्व बारकऱ्यांचं अधिष्ठान पांडुरंग परमात्मा हाच केवळ श्रेष्ठ असून कर्मकांडाला तिलांजली दिलेली आहे माऊली ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून भगवद्गीतेचा साधा आणि सोपा अर्थ सर्वसामान्य लोकांसाठी खुला केला. माऊलींचे हे कार्य संत श्रेष्ठ नामदेवरायांनी आपल्या अभंगाच्या माध्यमातून पुढे नेलं. आषाढी वारी निमित्त संत श्रेष्ठ नामदेव महाराजांची पालखी नरसी नामदेव येथून पंढरपूरसाठी प्रस्थान करते तर संत श्रेष्ठ जनाबाई यांची पालखी गंगाखेड येथून पंढरपूरसाठी प्रस्थान करते. या गुरुशिष्यांची पहिली भेट माता योगेश्वरीच अधिष्ठान असणाऱ्या आणि आद्यकवी मुकुंदराज स्वामी यांची समाधी असणाऱ्या, दासोपंतांची कर्मभुमी असणाऱ्या अंबाजोगाई या पवित्र भूमीमध्ये होते. या गुरुशिष्यांची भेट घडवून आणण्यासाठीच




केवळ अंबाजोगाई येथील अश्व रिंगण सोहळ्याचे आयोजन करण्यात येते अश्व रिंगण सोहळा म्हणजे समस्त वारकरी बांधवांना उत्साह देणारा, पांडुरंग रायाचा भेटीची आस वाढवणारा असा सोहळा होतो. या सोहळ्यामध्ये भजन कीर्तनाची असतेच परंतु त्यासोबतच वारकऱ्यांचे पाऊल, हमामा, हुतुतु, कबड्डी, कुस्ती असे विविध खेळ सोहळ्यामध्ये आयोजित केले जातात. या दोन्ही पालख्यांचे स्वागत अंबाजोगाईकरांच्या वतीने संत भगवान बाबा चौक याठिकाणी केले जाते.. त्या ठिकाणी अश्व रिंगण सोहळ्यामध्ये आपण सर्वांनी सहभागी व्हावे हे निमंत्रण घेऊन चिचखंडी येल्डा या परिसरातील वारकऱ्यांची दिंडी संत श्रेष्ठ नामदेवरायांच्या पादुकांच्या चरणी लीन होते. संत श्रेष्ठ नामदेवरायांना अश्व रिंगण सोहळ्याचे निमंत्रण दिले जाते आणि मग तेथून सर्व पालख्या विठुनामाचा जयघोष करत अश्व रिंगण सोहळ्यामध्ये सहभागी होण्यासाठी योगेश्वरीच्या मैदानाकडे रवाना होतात. योगेश्वरीचे मैदान प्रतिवर्षी अश्व रिंगण सोहळा पाहण्यासाठी सर्व भाविक भक्तांनी गजबजून गेलेले असते. याची देही याची डोळा हा सोहळा साठवून ठेवण्यासाठी प्रत्येक भाविक भक्तांची धडपड चाललेली असते. अश्व रिंगण सोहळा उत्तरोत्तर संपूर्ण मराठवाड्यामध्ये प्रचलित होत आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने प्रती वर्षाप्रमाणे याही वर्षी नंदकिशोर मुंदडा यांच्या वतीने बाल वारकरी समूह दिंडी नृत्य स्पर्धेचे आयोजन केलेले असून इयत्ता पहिली ते चौथी पाचवी ते सातवी व आठवी ते दहावी अशा तीन गटांमध्ये या स्पर्धा संपन्न होणार आहेत. प्रत्येक गटातील विजेत्या स्पर्धकांना ३१०१ प्रथम पारितोषक २००१ द्वितीय पारितोषक १०१ तृतीय पारितोषक ५०१ उत्तेजनार्थ पारितोषिक व सर्व विजेत्यांना सन्मान चिन्ह देण्यात येणार आहे याची सर्व स्पर्धकांनी नोंद घ्यावी. उत्कृष्ट नियोजन आणि गुरु-शिष्यांच्या भेटीचा अपूर्व योग यासाठी या सोहळ्याची वेगळी ओळख आहे. सर्व भाविकांनी शनिवार दिनांक ६ जुलै २०२४ रोजी दुपारी १ वा. आयोजित बाल वारकरी वेषभुषा स्पर्धेचा व अश्व रिंगण सोहळ्याचा आनंद घेण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन स्वागताध्यक्ष नंदकीशोर मुंदडा, दिलीप सांगळे, प्रकाश बोरगावकर, बाबा महाराज जवळगावकर, दिलीप गीत्ते, बळीराम चोपणे, अनंत अरसुडे, शशिकांत गायकवाड, शैलेश स्वामी, वैजनाथ देशमुख, प्रशांत अदनाक, महारुद्र शास्त्री खाडे महाराज, हभप किसन महाराज पवार, गोविंद महाराज सुक्रे, अमोल महाराज घोडके यांच्या वतीने करण्यात येत आहे संयोजन समितीतील सर्व सदस्य व वसुंधरा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात येत आहे.

सह्याद्रीचा राखणदार



# एक रुपयांत प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी व्हा-जिल्हाधिकाऱ्यांचे शेतकऱ्यांना आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

विविध नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांच्या होणा-या नुकसानीपासून शेतक-यांना आर्थिक संरक्षण देण्याच्या दृष्टीकोनातून राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. खरीप हंगाम २०२४ करिता कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांना केवळ १ रुपयामध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होता येईल. त्यामुळे शेतक-यांनी केवळ १ रुपये प्रती अर्ज एवढी रक्कम भरून पीक विमा पोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी शेतक-यांना केले आहे. योजनेत सहभागी होण्याची अंतिम मुदत १५ जुलै २०२४ आहे.केंद्र शासनाच्या 'कप न्ड कॅप मॉडेल' (८० : ११०) नुसार ही योजना खरीप हंगाम २०२३ ते रब्बी हंगाम २०२५-२६ या तीन वर्षाकरिता अधिसुचित पीकांसाठी विमा क्षेत्र घटक धरून 'सर्वसमावेशक पीक विमा योजना' राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. यामध्ये विमा कंपनीवर नुकसान भरपाईचे जास्तीत जास्त दायित्व एकूण विमा हप्त्याच्या ११० टक्यांपर्यंत असणार आहे. यापेक्षा जास्त असणारी नुकसान भरपाई राज्य शासन देईल. अधिसूचित क्षेत्रात अधिसूचित पिके घेणारे (कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणा-या शेतक-यांसह) सर्व शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहे. भाडेपट्टीने शेती करणा-या शेतक-यांना पीक विमा पोर्टलवर नोंदणीकृत भाडेकरार अपलोड करणे आवश्यक आहे. सर्व पिकांसाठी जोखीमस्तर ७० टक्के आहे.

योजना कार्यान्वयीन यंत्रणा : चंद्रपूर जिल्ह्यात खरीप हंगाम २०२४ करीता ओरिएन्टल इन्शुरन्स कं.लि. नेमण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या पीक विमा पोर्टलचा टोल फ्री क्रमांक १४४४७ हा असून पीक विमा कंपनीचा ई-मेल pmfby.180000orientalinsurance.co.in हा आहे.

विमा योजनेत सहभागी होण्याकरीता : इतर बिगर कर्जदार शेतक-याने आले आधारकार्ड, ७/१२ उतारा, बँक पासबुक, पीक पेरणीचे स्वयंघोषणापत्र घेऊन प्राधिकृत बँकेत विमा अर्ज द्यावा व हप्ता भरून सहभाग घ्यावा. हप्ता भरलेली पोच पावती जपून ठेवावी. कॉमन सर्व्हिस सेंटर (सीएससी), आपले सरकार सेवा केंद्राच्या मदतीने विमा योजनेत सहभागी होता येते त्यासाठी www.pmfby.gov.in या पोर्टलचे सहाय्य घेऊ शकता.

विमा संरक्षित रक्कम : खरीप २०२४ करीता चंद्रपूर जिल्ह्यासाठी पीकनिहाय निश्चित करण्यात आलेली विमा संरक्षित रक्कम पुढीलप्रमाणे आहे. ज्वारी २८००० रुपये, सोयाबीन ५२७५० रु., मुग २५८१७ रु., उडीद २६०२५ रु., तूर ३६८०२ रु., कापूस ५५७५० रु. आणि भात ४७७५० रुपये आहे.

पीक विमा योजनेंतर्गत या जोखमींचा समावेश : प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत पुढील कारणांमुळे शेतक-यांना टाळता न येण्याजोगे कारणांमुळे झालेल्या नुकसानीस विमा संरक्षण मिळेल. तसेच हवामान घटकांच्या प्रतिकुल परिस्थितीमुळे पिकांची पेरणी/ लावणी/ उगवण न झाल्यामुळे होणारे नुकसान, खरीप हंगामातील अपुरा पाऊस, हवामानातील इतर घटकांच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे पेरणी / लावणी न झालेले क्षेत्र हे सर्वसाधारण पेरणी क्षेत्राच्या ७५ टक्क्यांपेक्षा जास्त असल्यास विमा संरक्षण देय राहील.

पिकांच्या हंगामातील प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे होणारे नुकसान : हंगामातील प्रतिकुल परिस्थितीत, मात्र सर्वसाधारण काढणीच्या १५ दिवस आधीपर्यत पूर, पावसातील खंड, दुष्काळ इ. बाबीमुळे शेतक-यांच्या अपेक्षित उत्पादनामध्ये मागील लगतच्या ७ वर्षाच्या सरासरी उत्पादनाच्या ५० टक्के पेक्षा जास्त घट अपेक्षित असेल तर अधिसुचित क्षेत्रस्तरावर विमा संरक्षण देय राहील.

पीक पेरणीपासून काढणी पर्यतच्या कालावधीत पिकांच्या उत्पादनात येणारी : दुष्काळ, पावसातील खंड, पूर, क्षेत्र जलमय होणे, किड व रोगांचा व्यापक प्रार्दुभाव, भूस्खलन, नैसर्गिक आग, वीज कोसळणे, वादळ, गारपीट, आणि चक्रीवादळ यासारख्या टाळता न येणा-या जोखमींमुळे पिकाच्या उत्पादनात येणाच्या घटीपासून व्यापक विमा संरक्षण दिले जाईल.

स्थानिक नैसर्गिक आपत्ती : या बाबी अंतर्गत गारपीट, भुस्खलन, विमा संरक्षित क्षेत्र जलमय झाल्यास, ढगफुटी अथवा वीज कोसळल्यामुळे लागणारी आग या स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसानग्रस्त झाल्यामुळे होणारे पिकांचे नुकसान हे वैयक्तिक स्तरावर पंचनामे करुन निकश्चित करण्यात येईल.

काढणी पश्चात नुकसान : कापणी / काढणीनंतर सुकवणीसाठी शेतात पसरवून ठेवलेल्या पिकाचे काढणीनंतर २ आठवड्याच्या आत (१४ दिवस) गारपीट, चक्रीवादळामुळे आलेला पाऊस आणि बिगरमोसमी पावसामुळे नुकसान झाल्यास वैयक्ति स्तरावर पंचनामे करून नुकसान भरपाई निश्ति केली जाईल.

नुकसान भरपाई मिळण्यासाठी : नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे अकस्मात नुकसान झाल्यास तसेच काढणीपश्चात नुकसान झाल्यास घटना घडल्यापासून ७२ तासांच्या आत याबाबत, विमा संरक्षण घेतलेल्या शेतक-यांनी सर्व्हे नंबर नुसार सर्वप्रथम केंद्र शासन पीक विमा योजना प (Crop insurance - pp) चा वापर करावा. तसेच संबंधित विमा कंपनी , संबंधित बँक, कृषी / महसूल विभाग किंवा टोल फ्री क्रमांक याद्वारे कळविण्यात यावे. तसेच नुकसान कळवितांना सर्व्हे नंबर व नुकसानग्रस्त क्षेत्राचा तपशील कळविणे बंधनकारक आहे. विमा योजनेत सर्वप्रकारची नुकसान भरपाई रक्कम संबंधित शेतक-याच्या बँक खात्यात जमा करण्यात येते. त्यामुळे बँक खाते योग्य नोंदवावे.

महत्वाच्या नवीन बाबी : या योजनेत जे पीक शेतात लावले आहे, त्याचाच विमा घ्यावा. शेतात विमा घेतलेले पीक नसेल तर विमा नुकसान भरपाई पासून वंचित राहावे लागेल. या योजनेत सहभागी होण्याकरिता ई-पीक पाहणी अंतर्गत पिकांची नोंद करण्यात यावी. त्यामुळे सर्व शेतक-यांनी आपल्या पिकांची नोंद ई-पीक पाहणी मध्ये वेळेवर करावी. भाडे कराराद्वारे पीक विमा योजनेत सहभाग घेणा-या शेतक-यांना नोंदणीकृत भाडे करार प्रत पीक विमा पोर्टल वर अपलोड करावी लागेल.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सन २०२३-२४ या वर्षात ३ लक्ष ५० हजार ९६९ शेतक-यांनी सहभाग घेवून ३ लक्ष २७ हजार ९०१ हे. क्षेत्र विमा संरक्षित केले होते. त्या अनुषंगाने एकूण ९१६२.९२ लक्ष रकमेचा विमा संबंधित शेतकयांच्या खात्यात जमा करण्यात आलेला आहे.

सद्यस्थितीत प्रधानमंत्री पीक विमा योजना सन २०२४-२५ अंतर्गत केवळ १ रुपया प्रति शेतकरी या दराने जिल्ह्यातील ५८७८ शेतक-यांनी १०४९३ अर्जाव्दारे सहभाग नोंदविलेला आहे. या योजनेंतर्गत नोंदणीची अंतिम मुदत १५ जुलै, २०२४ पर्यंत असल्याने जास्तीत जास्त शेतक-यांनी या योजनेमध्ये सहभागी होण्याकरीता आपल्या नजिकच्या बँक शाखेत तसेच आपले सरकार सेवा केंद्रामध्ये विहीत मुदतीत विमा हप्ता भरून सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले असून या योजनेबाबत अधिक माहितीसाठी क्षेत्रीय स्तरावरील मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी तसेच जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांच्या कार्यालयाकडे संपर्क करावा.

# सामाजिक न्याय विभागाच्या वतीने सामाजिक न्याय दिन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सामाजिक न्याय विभागाच्या वतीने २६ जून रोजी सामाजिक न्याय दिन तसेच आंतरराष्ट्रीय मादक द्रव्य पदार्थ सेवन विरोधी दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त सामाजिक न्याय भवनापासून ते जिल्हाधिकारी कार्यालयपर्यंत रॅली काढण्यात आली. जिल्हा जात प्रमाणपत्र समितीच्या संशोधन अधिकारी पुष्पलता आत्राम यांनी रॅलीला हिरवी झेंडी दाखवून सुरवात केली यानंतर सामाजिक न्याय भवनात सामाजिक न्याय दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संशोधन अधिकारी पुष्पलता आत्राम तर प्रमुख अतिथी म्हणून गोंडवाना विद्यापीठाचे डॉ. संजीव निंबाळकर, प्रा. विश्वानाथ राठोड, प्रा. कल्पना कवाडे तसेच नर्सिंग महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. या कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय मादक द्रव्य पदार्थ सेवन विरोधी दिन म्हणून शपथ घेण्यात आली. तसेच सदर कार्यक्रमात सामाजिक न्याय दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त राजू घोले व श्री. तेटेवार यांना सम्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विशेष अधिकारी प्रतिभा भागवतकार यांनी तर आभार समाज कल्याण निरीक्षक मनोज माकोडे यांनी मानले. यावेळी गणमान्य व्यक्ती व अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येत उपस्थित होते.

# तृतीयपंथीयांना प्रमाणपत्र व ओळखपत्र देण्यासाठी संपर्क करण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्हयातील तृतीयपंथीय व्यक्तींना नॅशनल पोर्टल फॉर ट्रान्सजेंडर पर्सन या केंद्र शासनाच्या पोर्टलद्वारे तृतीयपंथी असलेबाबतचे प्रमाणपत्र व ओळखपत्र उपलब्ध करून द्यावयाचे आहे. त्यासाठी तृतीयपंथीयांची कागदपत्रासह माहिती आवश्यक आहे. त्याकरीता तृतीयपंथीयासाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, तृतीयपंथीयांची मंडळे किंवा संघटना येथील प्रतिनिधीनी किंवा स्वत: तृतीयपंथी या व्यक्तीने सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, चंद्रपूर या कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधुन तृतीयपंथीय असलेबाबतची वैयक्तिक व रहिवाशी पुराव्याबाबतची माहिती त्वरित सादर करावी. जेणेकरून आपले माहितीचे आधारे नॅशनल पोर्टल फॉर ट्रान्सजेंडर पर्सन या पोर्टलवर माहिती भरून तृतीयपंथी असलेबाबतचे प्रमाणपत्र व ओळखपत्र देण्यात येईल, असे सहायक आयुक्त, समाजकल्याण यांनी कळविले आहे.

# रविवारी गडचांदूरात मोफत भव्य महाआरोग्य शिबीर

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

शहरातील ना. सुधीर मुनगंटीवार सेवा केंद्र, भाजपा जनसंपर्क कार्यालय तथा आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी(मेघे) यांच्या संयुक्त आयोजनातून येत्या रविवारी (दि. ३० जून रोजी) स्थानिक स्व. भाऊराव पाटील चटप आश्रमशाळेत भव्य महाआरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये जवळपास सर्वच प्रकारच्या आजारांचे निदान, उपचार व शस्त्रक्रिया नि:शुल्कपणे करून देण्यात येणार आहेत. अशी माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे.सदर शिबीर सकाळी ०९ वाजेपासून सुरू होणार असून याठिकाणी आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी (मेघे) येथील मेडिसीन, नेत्ररोग, सर्जरी, बालरोग, स्त्रिरोग, कान-नाक-घसा, अस्तिरोग, त्वचारोग आणि कॅन्सर यांसारख्या रोगांवरील तज्ञ डॉक्टरांची उपस्थिती राहणार असून याठिकाणी सर्व चाचण्या व मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोफत करून देण्यात येणार आहे. त्यासाठी शिबीरात येणाऱ्या नागरिकांनी आधारकार्ड व केशरी किंवा पिवळे रेशनकार्ड सोबत आणावे. असे आवाहन आयोजक तथा भाजपाचे विधानसभा निवडणुक प्रमुख, माजी जि. प. अध्यक्ष देवराव भोंगळे यांनी केले आहे.

## अमृत पाणीपुरवठा योजना अंतर्गत

# चुकीच्या पद्धतीने नागरिकांना देण्यात आलेले देयक तात्काळ रद्द करा

## यंग चांदा ब्रिगेडची मागणी, मनपा आयुक्तांना निवेदन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**



चंद्रपूर महानगर पालिकेच्या वतीने सुरू करण्यात आलेली अमृत पाणी पुरवठा योजना पूर्णपणे कार्यान्वित होण्यापूर्वीच नागरिकांना भरमसाठ देयक देण्यात येत आहेत. त्यामुळे चुकीच्या पद्धतीने नागरिकांना देण्यात आलेले देयके तात्काळ रद्द करा, अशी मागणी यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने करण्यात आली आहे.

आज शुक्रवारी, यंग चांदा ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी सदर मागणीचे निवेदन मनपा आयुक्तांना दिले आहे. यावेळी यंग चांदा ब्रिगेडच्या महिला शहर संघटिका वंदना हातगावकर, सायली येरणे, आदिवासी विभागाचे जिल्हा अध्यक्ष जितेश कुळमेथे, अल्पसंख्याक विभागाचे शहर अध्यक्ष सलीम शेख, युवती प्रमुख भाग्यश्री हांडे, शहर संघटक विश्वजीत शहा, शहर संघटक करणसिंह बैस, हरमन जोसफ, मुन्ना जोगी, रुपेश पांडे, राम जंगम, दुर्गा वैरागडे, विलास सोमलवार, चंदा ईटनकर, विमल काटकर, अतिना झाडे, कविता निखाडे, नंदा पंधरे, कल्पना शिंदे, सायली तोंडरे आदी उपस्थित होते.चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रात अमृत पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यात येत आहे. या योजने अंतर्गत प्रत्येक ग्राहकांच्या घरी डिजिटल मीटर बसविण्यात आले आहेत. मात्र, या योजनेचे काम अद्यापही पूर्ण झालेले नाही. अनेक भागात नळ जोडणीचे काम अपुरे आहे. अनेक भागात योजने अंतर्गत नळ जोडणी झाली असली तरी नळाला पाणी येत नसल्याच्या तक्रारी नागरिकांकडून प्राप्त होत आहेत. विशेषतः काही भागात नळाची पाईपलाईन खंडित झालेली आहे. तरीही नागरिकांना ३ महिन्यांचे भरमसाठ देयक देण्यात आले आहे. या चुकीच्या देयकांमुळे नागरिकांना अनावश्यक आर्थिक भार सहन करावा लागत आहे. त्यांना प्रत्यक्षात पाणी मिळाले नाही तरीही त्यांना मोठ्या रकमांचे देयक आले आहे. यामुळे नागरिकांमध्ये असंतोष वाढत आहे. नागरिकांना त्वरित दिलासा देण्यासाठी, महानगरपालिकेने तात्काळ कारवाई करून अपूर्ण कामे पूर्ण करावीत आणि चुकीच्या देयकांची चौकशी करून ती रद्द करावीत, अशी मागणी सदर निवेदनाच्या माध्यमातून यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने मनपा आयुक्त विपिन पालिवाल यांना करण्यात आली आहे.

# शस्त्रक्रियेकरीता रुग्ण तुकडी रवाना



**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

दि. १६ जून रोजी गोंडपिपरी येथील ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्र, भाजपा जनसंपर्क कार्यालय तथा आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी (मेघे) यांच्या संयुक्त विद्यमाने आणि भाजपाचे विधानसभा निवडणुक प्रमुख देवराव भोंगळे यांच्या नेतृत्वात भव्य महाआरोग्य शिबीर (मोफत रोगनिदान, उपचार व शस्त्रक्रिया) संपन्न झाले. या शिबीराचा गोंडपिपरी तालुका परीसरातील १४२७ नागरीकांनी लाभ घेतला; त्यापैकी ५१५ रूग्ण विविध शस्त्रक्रियांसाठी पात्र ठरले. या पात्र रुग्णांवर आजपासून सावंगी (मेघे) येथे विविध शस्त्रक्रिया पार पडणार आहेत. त्याकरिता काल (दि. २७) सकाळी ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्र, भाजपा जनसंपर्क कार्यालय गोंडपिपरी येथून ७६ रुग्णांची दुसरी तुकडी शस्त्रक्रियेसाठी रवाना झाली.यावेळी तालुकाध्यक्ष बबन निकोडे, शहराध्यक्ष चेतन गौर, माजी जि. प. सदस्य अमर बोडलावार, नगरसेवक राकेश पुण, संजय झाडे, शिथील लोणारे, बंडू बोनगीरवार, प्रवीण धोडरे, प्रकाश रापलवार, रमेश दिंगलवार, मनोज वनकर, गणेश मेरूगवार, राहुल चौधरी, गणेश डहाळे, सुरेखा श्रीकोंडावार, अरुणा जांभूळकर, मायाबाई वाघाडे, नगरसेविका अश्विनी तोडासे, पंकज चिलनकर, वैभव बोनगिरवार, प्रज्वल बोबाटे आदिंनी उपस्थित राहून रुग्णांना बसने रवाना करीत यशस्वी शस्त्रक्रियेसाठी शुभेच्छा दिल्या.

# मुल तालुका कृषी कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे पत्रकारांवर दबाव तंत्र

## प्रेस क्लबने नोंदविला निषेध;उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले निवेदन

**मुल । प्रतिनिधी**

तालुक्यातील पत्रकारांनी कृषी कार्यालया संदर्भातील बातम्या प्रकाशित करु नये. कार्यालयाची परवानगी घेऊनच बातम्या प्रकाशित कराव्यात म्हणून तालुका कृषी कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी दि २५ जुन मंगळवार ला तहसीलदार व ठाणेदार यांना निवेदन दिले. ही घटना निषेधार्थ असून पत्रकारांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारी आहे त्यामुळे प्रेस क्लब मूलच्या वतीने दिनांक २८ जून शुक्रवार ला उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देत निषेध नोंदविला व कृषी करण्यातील कर्मचाऱ्यांनी विरोधात कारवाई करण्याची मागणी यावेळी केली आहे.

तालुका कृषी कार्यालयात सुरू असलेल्या अनागोंदी कारभार व सावळा गोंधळ या बाबत एका वर्तमानपत्रात कृषी अधिकारी मिळेचना! शेतकऱ्यांनी जावे कुणाकडे? या आषयाचे वृत्त प्रकाशित केले. या बातमी मध्ये कार्यालयातील वरिष्टांचे कोट घेतले आहे. मात्र कार्यालयातील आर्थिक गैरव्यवहार व भ्रष्टाचार उघड होऊ नये म्हणून पत्रकारांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालया संदर्भातील बातम्या छापु नये यासाठी दबाव टाकण्याचे हेतूने कर्मचार्यांनी निवेदन दिल्याने आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे. ही बाब निषेधार्थ असून पत्रकार्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याला बाधा निर्माण करणारी आहे. तसेच कार्यालयातील भ्रष्टाचार लपविण्याकरीता कर्मचार्यांनी केलेला हा केविलवाना प्रयत्न आहे. कर्मचाऱ्यांनी असे करतांना कार्यालय प्रमुख किंवा वरिष्टांची कोणतीही परवांगी घेतलेली नाही. आपल्याच मनमानीने तालुका प्रशासनाला निवेदन देत पत्रकारांवर दवाव आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे तालुका कृषी कार्यालयातील कर्मचार्यांनी सेवाशर्तीचा भंग केला आहे. योग्य चौकशी करून तात्काळ बडतर्फीची कार्यवाही करण्यात यावी. अशी मागणी प्रेस क्लब मूल च्या वतीने करण्यात आली आहे.यावेळी प्रेस क्लब चे अध्यक्ष विजय सिद्धांवार,उपाध्यक्ष सतीश राजुरवार, शशिकांत गणवीर, अमित राऊत, कुमुदीनी भोयर, नासिर खान, प्रमोद मशाखेत्री, रोहित कामडे, धर्मेंद्र सुत्रपवार, नितेश मॅकलवार आदी उपस्थित होते.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .